नि.दि.दा.क्र.४३/२०१९
शैलजा वि. रामचंद्र व इतर

## अर्ज निशाणी ६८ खालील आदेश

## (**CNR MHSI**080006512019)

०१. प्रस्तूतच्या अर्जान्वये वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.०४ कल्पना जयसिंग मोरे यांच्या वारसांना दाव्याच्या अभिलेखावर घेण्यास विनंती केलेली आहे. त्यांनी पुढे असे नमुद केले आहे की, प्रतिवादी क्र.०४ ह्या दि.१०/०८/२०२४ रोजी मयत झाल्या आहेत. सबब, प्रस्तूत वादी यांनी प्रतिवादी क्र.०४ चे वारस अभिलेखावर घेण्याची विनंती केली आहे.

०२. प्रतिवादी क्र.०४ ते ०६ यांनी सदर अर्जावर आपले म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रस्तूत अर्ज खोटा व खोडसाळ आहे. अर्जात नमुद कारण संयुक्तीत नाही. सबब, वादीचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०३. प्रस्तूत दावा वादीने दावा मिळकतींचे वाटप होणेकरीता व ठरावाकरीता दाखल केला आहे. प्रस्तूत प्रतिवादी क्र.०४ चे वारस हे प्रस्तूत दाव्यास आवश्यक पक्षकार आहेत. अर्जात नमूद कारण योग्य वाटते. सबब, वरील कारणमिमांसेचा सारांश असा की, प्रस्तूत अर्ज मंजूर करणे योग्य वाटते. करीता, खालील प्रमाणे आदेश पारित करत आहेः

### – आदेश –

०१. निशाणी क्र.६८ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

०२. वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.०४ यांच्या वारसांना प्रतिवादी क्र.४ चे वारस म्हणून अभिलेखावर समाविष्ट करुन घ्यावे.

SHAIEKH TAJJUM SHAIEKH HAMID
Digitally signed by SHAIEKH TAJJUM SHAIEKH HAMID
Date: 2025.03.28 16:35:15 +0530

स्थळ : कणकवली (टी.एच.शेख)

दिनांक : २८/०३/२०२५ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कणकवली.